34 Year's

Maharashtra Political Science & Public Adminstration Conference Research Journal

# VICHAR MANTHAN

## National Research Journal of Political Science and Public Administration

(A Peer Reviewed Journal)

Vol. - 4 , No - 2, Issue - 11 May-Aug. 2017 ISSN- 2347-9639

♦ **Chief Editor / President** ♦

**Prin. Dr. P. D. Deore**

11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc., Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13 Mob : 9423980457

♦ **Editor** ♦

**Prin. Dr. Pramod Pawar**

Dhandai Arts College, Amalner Dist. Jalgaon

Email- pramodpawar1761@gmail.com Mob:9423582073

♦ **Editor / Secretary** ♦

**Prin. Dr. Manohar Patil**

S.S.V.P.S College, Dhule

Email-manoharpatil123@gmail.com Mob:9422287053

♦ **Hon'ble Guest Editors** ♦

- **Dr. Sushama Yadav** (New Delhi)
- **Dr. Sanjeevkumar Sharma** (Meerut)
- **Dr. Subhash Chandrakar** (Raipur)
- **Dr. Shilpi Bose** (Raipur)
- **Dr. Anita Deshpande** (Bhopal)
- **Dr. Garima Jawnalkar** (Bhopal)
- **Dr. Sunilkumar Goyal** (Khandwa)
- **Dr. Ketan Govekar** (Panji, Goa)
- **Dr. J. Prabhash** (Kerala)
- **Dr. Shaikh Abul Barkat** (Hydrabad)

♦ **Editing Assists** ♦

- **Dr. Sambhaji Patil** (Shindkheda)
- **Asst. Prof. Gautam Bhalerao** (Jalgaon)
- **Asst. Prof. Viqar Shaikh** (Jalgaon)
- **Asst. Prof. Sanjay Patil** (Chopada)

♦ **Advisory Editors** ♦

- **Dr. Vitthal More** (Latur)
- **Dr. Vasanti Rasam** (Kohlapur)
- **Dr. Bharati Patil** (Kolhapur)
- **Dr. Surendra Jondhale** (Mumbai)
- **Dr. Alka Deshmukh** (Nagpur)
- **Dr. Mohan Kashikar** (Nagpur)
- **Dr. Prakash Pawar** (Kohlapur)
- **Dr. Rajeshwari Deshpande** (Pune)
- **Dr. Bal Kamble** (Karjat-Pune)
- **Dr. Ashok Naikwade** (Aurangabad)
- **Dr. Balasaheb Bhosale** (Tasgaon)
- **Dr. Pyarelal Suryawanshi** (Amravati)
- **Dr. Jyostna Sonkhaskar** (Sinnar)
- **Dr. Suresh Bhalerao** (Parbhani)
- **Dr. Sanjay Gore** (Gadchiroli)
- **Dr. Sanjay Wagh** (Mumbai)

♦ **Managing Editor** ♦

Mr. Yuvraj Mali

♦ ***Publishers*** ♦

**Atharva Publications**

Basement, Om Hospital, Near Anglo Urdu Highschool, Dhake Colony, Jalgaon - 425001 Ph.No. 0257-2239666

**Maharashtra Political Science and Public Administration Conference**

Reg. No. MAH/12-83/ Aurangabad-F-985

**Visit Us : www.vicharmanthanjournal.com** **E-Mail : vicharmanthanjournal@gmail.com**

**Subscription**

**Individuals : Rs. 1000/- For Five Years** **Institutions : Rs. 1500/- For Five Years** **Singal Issue Price Rs.100/**

विचारमंथन या संशोधन प्रत्रिकेत प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक आणि सल्लागार मंडळ यांना मान्य असतीलच असे नाही. या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखातील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या-त्या लेखकांवर राहिल.

मेसर्स अथर्व पब्लिकेशन्सच्या वतीने कार्यकारी संपादक श्री.युवराज माळी यांनी प्लॉट नं.१७, देविदास कॉलनी, धुळे-४२४ ००१. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व आविष्कार प्रिंटर्स, अयोध्यानगर, जळगाव येथे मुद्रित केले. मोबाईल : ९४०५२०६२३०,फोन : ०२५७-२२३९६६६.

# * अनुक्रमणिका *


- Reservation Issue of Minority Communities in India ........ ०७
  - Dr. Vidya S. Raut, Akola
- Social Justice & Reservation in India ........ १०
  - Dr. Shriniwas Bhong, Sangamner
- Muslim Reservation is Vote Bank Politics ........ १२
  - Prin Dr. Pramod Pawar
  - Prof.Vaqar R.Shaikh, Jalgaon
- Globalisation and Affirmative Action in India ........ १४
  - Dr Vaibhav R Suryawanshi, Bhor, Dist –Pune
- Indian Federalism -Claims for New States ........ १७
  - Dr. Kanti Kiran David, Khandwa (M.P)
- आरक्षण आंदोलन एक अवलोकन ........ २०
  - डॉ. महिमा बाजपेयी, खण्डवा (म.प्र.)
- आरक्षण आन्दोलन का इतिहास एक दृष्टिकोन ........ २२
  - डॉ. सुनीता कविश्वर, खण्डवा (म.प्र.)
- आरक्षण आंदोलन हरियाणा के विशेष संदर्भ में ........ २४
  - डॉ कृष्णा सोलंकी, खण्डवा (म.प्र.)
- आरक्षण आंदोलन एक समीक्षा (पाटीदार आंदोलनों के विशेष संदर्भ) ........ २६
  - डॉ.एस.के.गोयल, खण्डवा (म.प्र.)
- आरक्षण एवं ऐतिहासिक अवलोकन ........ २९
  - डॉ. अर्चना पाटिल, सावनेर, महाराष्ट्र
- आरक्षण ........ ३२
  - प्रा. सरला वसंतराव मेश्राम, उमरेड
- मराठा क्रांती मोर्चे : एक चिंतन ........ ३५
  - डॉ. व्ही.एल. एरंडे, निलंगा
- आरक्षण आणि वास्तवता ........ ४१
  - प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, कर्जत,
  - प्रा. प्रदीप जगताप, कर्जत
- भारतीय संविधान आणि मराठा आरक्षण ........ ४३
  - प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर, मेहकर
- अनुसूचित जमातीचे राजकीय आरक्षण (विशेष संदर्भ – नंदुरबार जिल्हा ) ........ ४७
  - प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, अमळनेर
  - धनराज पाटील, नंदुरबार
- प्रतिनिधीत्वाचा मुद्दा : महिला आरक्षण ........ ५१
  - माधव चोले, देगलूर, जि.नांदेड.




CamScanner

# आरक्षण आणि वास्तवता

- प्राचार्य डॉ. बाळ कांबळे
कर्जत
प्रा. प्रदीप जगताप
कर्जत

**प्रस्तावना :-**

भारतीय राजकीय व सामाजिक पर्यावरणात सध्या आरक्षण हा मुद्दा प्रकर्षाने चर्चेत आहे. हरियाणा राज्यातील जाटांचे आंदोलन, गुजरातमधील पाटीदारांचे किंवा पटेलांचे आंदोलन, आंध्र प्रदेशमधील कापूंचे आंदोलन तर महाराष्ट्रातील मराठा समाजाचे आंदोलन यामुळे आरक्षणाचा मुद्दा तीव्रतेने चर्चेत आहे. या आंदोलनामध्ये आरक्षण विरोध, आरक्षण समर्थन, आम्हालाही आरक्षण द्या अशा मागण्या होताना दिसत आहेत. सरकार, राजकीय पक्ष आणि जातीय संघटना आपापल्या संकुचित व स्वार्थी हेतूने त्याकडे पाहत आहेत. आरक्षण ही खिरापत आणि निवडणूक जिंकण्याचे प्रभावी माध्यम आहे असे मानणाऱ्या राजकीय नेत्यांनी त्याचा बट्ट्याबोळ केला आहे. त्यामुळे देशातील राजकीय तसेच सामाजिक वातावरण अस्वस्थ बनत चालले आहे. या पार्श्वभूमीवर आरक्षणाच्या प्रश्नाचा निष्पक्ष, वस्तुनिष्ठ गांभीर्यपूर्वक विचार करणे गरजेचे आहे.

**आरक्षणाचा अर्थ :-** आरक्षण ही एक सकारात्मक भेदभाव करणारी व्यवस्था आहे. ज्यांना सामाजिक इतिहासामुळे संधीच नाकारली गेली आहे, त्यांना समान संधी प्राप्त व्हावी म्हणून केलेली सोय म्हणजे आरक्षण होय. आरक्षणाच्या मागे समान हक्कांचेच तत्त्व असते. आरक्षण ही प्रस्थापितांच्या विरुद्ध सूड घेणारी यंत्रणा मुळीच नाही. भारतीय राज्यघटनेत आरक्षण असा शब्द नाही, तर पर्याप्त प्रतिनिधित्व असा उल्लेख आहे. सामाजिक न्याय आणि समता प्रस्थापित करणे त्याचा मूळ उद्देश आहे. आरक्षणाचा मुद्दा हा केवळ नोकरी किंवा राजकारणातील आरक्षणापुरता मर्यादित नाही. या देशातील समाजव्यवस्थेने बहुजन समाजाला शेकडो वर्षे हक्कांपासून वंचित ठेवले, विकासाच्या प्रवाहापासून दूर ठेवले. त्यामुळे त्या वंचित घटकांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. वंचित माणसाला समर्थपणे उभा करण्याचे साधन म्हणजे आरक्षण होय. आरक्षण म्हणजे सवलत, मेहरबानी किंवा कुबड्या नसून ते शासन प्रशासनातील न्याय हिस्सा, वाटा मिळविण्यासाठी वंचित समाज घटकाला दिलेले घटनात्मक संरक्षण आहे.

वंचित, दलित, अस्पृश्य यांचा मानवतावादी दृष्टीने विचार महात्मा ज्योतिबा फुले यांनी केला. त्यांनी त्यांचे मानवी हक्क मिळवून देण्यासाठी ब्रिटिश सरकारकडे मागणी केली होती. जाती जातीच्या संख्येत कामे वाटून द्यावीत, अशी त्यांनी ब्रिटिश सरकारकडे मागणी केली होती. म्हणजेच महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्वप्रथम आरक्षणाची संकल्पना मांडली होती असे म्हणता येईल. सर्वप्रथम आरक्षण लागू करण्याचा मान छत्रपती शाहू महाराज यांना जातो. त्यांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात ब्राम्हण, पारसी, प्रभू व शेणवी या उच्च जातींना वगळता उर्वरित समाजाला ५०% आरक्षण लागू केले होते. स्वातंत्र्यानंतर आरक्षणाची घटनात्मक तरतूद करण्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सिंहाचा वाटा आहे.

आरक्षण हे फक्त भारतातच आहे असा एक गैरसमज आहे. जागतिक पातळीवरसुद्धा विविध देशात सामाजिक न्यायासाठी आरक्षणाची तरतूद आहे. अमेरिकेत Affirmative Action असे आरक्षणाला म्हटले जाते. कॅनडामध्ये त्याला Employment Eqality म्हणतात तर इंग्लंडमध्ये त्याला Positive Discrimination असे म्हणतात. प्रत्येक देशात आरक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन त्या त्या देशातील सामाजिक इतिहासानुसार वेगळा आहे. भारतामध्ये ज्याप्रमाणे जातीय आधारावर आरक्षण आहे तसे जगातील इतर देशात आढळून येत नाही. असे असले तरी ज्या ज्या ठिकाणी वांशिक आधारावर भेदभाव होता, अन्यायकारक सामाजिक व्यवस्था होती त्या त्या देशामध्ये तेथील सामाजिक परिस्थितीला अनुसरून आरक्षण किंवा Positive Discrimination ची व्यवस्था आहे. त्यामुळे आरक्षण हे फक्त भारतातच आहे असे नाही.

आरक्षणाला विरोध करणारे आरक्षण हे फक्त १० वर्षांपर्यंतच दिले जावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते असे वारंवार स्पष्ट करीत असतात. त्यातील वस्तुस्थिती ही की, आरक्षण दिल्यानंतर १० वर्षांनी त्याचं परीक्षण केलं जावं, दर दहा वर्षांनी पाहणी करावी आणि आरक्षणाची वैधता ठरवावी, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते. हे आरक्षण राजकीय आरक्षणासंदर्भात होते. त्याप्रमाणे दर दहा वर्षांनी तशी पाहणी केली जाते. ओपन राजकीय क्षेत्रातून किती टक्के मागासवर्गीय निवडून आले ते पाहिले जाते. त्याचे प्रमाण नगण्य असते म्हणून पुन्हा आरक्षण १० वर्षांसाठी दिले जाते. शैक्षणिक आरक्षण हे १९८२ साली सुरु झाले आहे. ज्याप्रमाणे राजकीय आरक्षणाची दर १० वर्षांनी वैधता तपासली जाते त्याप्रमाणे शैक्षणिक आरक्षणाची दर पाच वर्षांनी वैधता तपासली जाते. ते वैध असते म्हणून दिले जाते.

ओबीसी आणि एससी, एसटी आरक्षणाची तुलना बऱ्याचवेळा करताना ओबीसींनाच क्रिमीलेयर का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. याचा विचार करताना दोन्ही समाज घटकांना आरक्षण देण्यापाठीमागील भूमिका वेगवेगळी आहे याचा विचार करावा लागतो. ओबीसींना आरक्षण हे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी आहे. तर एससीना अस्पृश्यता आणि शोषण याविरुद्ध आरक्षण आहे. मंडल आयोगाच्या निकषानुसार ओबीसी आरक्षण हे प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मागास जातींना दिले आहे. माळी, साळी, कोळी, सुतार, दैवज्ञ ब्राह्मण अशा बारा बलुतेदार जाती ओबीसीत येतात. यांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक उत्थान झाले



CS CamScanner

की क्रिमीलेयर लावून वगळता येते. कारण ज्या क्रायटेरियावर आरक्षण दिले आहे त्याची पूर्तता होते. तर एससी / एसटीचे आरक्षण हे पूर्व अस्पृश्य शोषित आणि दुर्लक्षित जातींना आहे. यात नवबौद्ध, महार, मांग, चांभार, ढोर, आदिवासी या जाती येतात. त्यांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक उत्थान झाले तरी इतरांच्या मनातली अस्पृश्यता शोषण आणि हलके मानले जाणे संपत नाही. भेदभाव तसाच राहतो. म्हणून एससी / एसटीला क्रिमीलेयर लावता येत नाही.

जातीवर आधारित आरक्षण रद्द करावे आणि आर्थिक आधारावर आरक्षण द्यावे ही मागणी सर्वांना पटणारी आहे, परंतु त्या आधी जातीय विषमता नष्ट करण्याची गरज आहे. ती नष्ट झाल्यास आरक्षणाची आवश्यकताच राहणार नाही. तेव्हा कुणीही आरक्षणाचे समर्थनही करणार नाही. त्याकरिता देशातील जातीय विषमता आधी नष्ट करण्याची गरज आहे. आर्थिक आधारावर आरक्षण दिलेले आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. फक्त ते गरीब व्यक्तींना दिलेलं नाही, ते गरीब जातींना दिलेले आहे, ते म्हणजे ओबीसी आरक्षण. आर्थिक आधारावर आरक्षण देताना गरीब शोधायचा कसा हा खरा प्रश्न आहे. सरसकट गरिबांना आरक्षण देता येत नाही. तो का गरीब झाला हे पाहावे लागेल. तो त्याच्या वैयक्तिक दुर्गुणांमुळे गरीब आहे की त्याने संधी नाकारली आहे हे महत्त्वाचे आहे.

अलीकडच्या काळात आरक्षणाचा मुद्दा गंभीर होण्याचे कारण म्हणजे सरकारची, राजकीय नेत्यांची, पक्षांची संकुचित भूमिका हे आहे. जातीय अस्मितांना फुंकर घालून त्या आधारे एकगठ्ठा मते मिळविण्याचे साधन म्हणून आरक्षणाकडे पाहिले जात आहे. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेतले जातात. त्यातून विवेकी, पुरोगामी व वस्तुनिष्ठ भूमिका नाकारली जात आहे. निवडून येण्यासाठी आरक्षणाचे समर्थन करणे, आरक्षणांना विरोध करणे, आरक्षण देण्याचे आश्वासन देणे असे मार्ग राजकीय पक्षांकडून, नेत्यांकडून अवलंबिले जात आहेत. त्यातून आरक्षणाचा हेतू, वास्तवता नाकारली जात आहे. त्याचा गांभीर्यपूर्वक विचार होणे आवश्यक आहे.

आरक्षणाची अपरिहार्यता लक्षात घेवुन आरक्षणाच्या बाबतीत पुढील मुद्यांचा विचार व्हावा असे वाटते.

१. कोणता समाज खरोखर मागास आहे आणि कोणते लाभार्थी पात्र नाहीत याचा पुनर्विचार व्हायला हवा तरच आरक्षण योग्य व्यक्तीला मिळेल.
२. आरक्षण मिळाले की आपल्या मुलामुलींना रोजगार मिळेल असे आरक्षणाची मागणी करणाऱ्यांना व समर्थन करणाऱ्यांना वाटत असले तरी वास्तव असे आहे की गेली काही वर्षे विशेषत: जागतिकीकरणानंतर सरकारी नोकऱ्यांची संख्या सातत्याने कमी होते आहे.
३. बदलत्या काळानुसार आरक्षणाची लोकसंख्येच्या आधारावर समीक्षा होत राहणे गरजेचे आहे.
४. आरक्षणावर बोलणे ही ज्या नेत्यांना आपली मक्तेदारी वाटते, त्यांना चाप लावून 'कोण' काय बोलतो यापेक्षा कोण 'काय' बोलतो याकडे लक्ष द्यायला हवे.
५. ज्या जातींची आरक्षणाची गरज खरंच संपली आहे त्यांचे आरक्षण काढून घेण्याची राजकीय हिंमत आणि सामाजिक समज असणारे नेतृत्व असणे गरजेचे आहे.
६. आरक्षण हे राजकारणाचे साधन न मानता तज्ज्ञांच्या मताचा विचार करून निष्पक्ष आणि विधायक निर्णय घेणारे राजकारण केले पाहिजे.

**संदर्भ सूची :-**

१. balbadarpan.com
२. makarand Desai Marathi. Blogspot.in
३. subhash Ingle blogspot.in
४. दीक्षित अभिराम, ७ सप्टेंबर २०१२, drabhiram blogspot.in
५. www.dainikprabhat
६. navshakti.co.in
७. prahaar.in

•••